# लोक आयुक्त कार्यालय
## महाराष्ट्र राज्य
नवीन प्रशासन भवन,
१ला व ३रा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
फॅक्स : ०२२-२२०२ ४५४०, दूरध्वनी क्र. : ०२२-२२८५ २९०१ /२२८३ ५६००/२२८२ ४३५८
ई-मेल आयडी : *soadm.lokayukta@maharashtra.gov.in*


संदर्भ : दिनांक : 22 SEP 2026

## जाहीर नोटीस 18889/26

लोक आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहनचालक या संवर्गातील ३ पदे मासिक ११ महिन्यांच्या कालावधीकरीता बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्यासाठी नोंदणीकृत मनुष्यबळ पुरवठाधारक संस्था / कंपनी यांच्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

### निविदेचे वेळापत्रक व इतर सूचना

| निविदा संदर्भ | तपशील |
|---|---|
| निविदा प्रसिध्दीचा दिनांक | दि. २२/०९/२०२६ |
| निविदा सादर करण्याचा कालावधी | **दिनांक २८/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** |
| निविदा उघडण्याचा दिनांक | **दिनांक २९/०९/२०२६ दुपारी ०३.०० वाजता** |
| कार्यालय पत्ता व संपर्क | लोक आयुक्त कार्यालय,<br>पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,<br>मंत्रालयासमोर,<br>मुंबई-४०००३२.<br>दुरध्वनी क्रमांक-०२२-२२८३५६०० / २२८५२९०१ |

**१. <u>अर्हता :-</u>**

वाहनचालकाकडे पुढील अर्हता असणे आवश्यक आहे :-

१. उमेदवार भारताचा नागरीक असावा व त्यास मराठी भाषा बोलता, लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्षाच्या दरम्यान असावे.
३. उमेदवाराने किमान **माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा** (S. S.C.) उत्तीर्ण केलेली असावी.
४. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.
५. संस्थेकडून पुरविण्यात येणारे उमेदवार हे वाहन चालविण्यासाठी शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.
६. उमेदवाराकडे हलकी व जड वाहने चालविण्याचा परवाना असावा.
७. वाहन चालविण्याचा **कमीत कमी ३ वर्षे कालावधीचा** अनुभव असावा.

## २. सर्वसाधारण सूचना:-

१. संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे व त्या संबंधीचा कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे. मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांची कार्यालये मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे महानगरपालिका किंवा नवी मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीत असेल अशा निविदाकारांना प्राधान्य दिले जाईल.

२. निविदाकाराने तांत्रिक व वाणिज्यिक निविदांमधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित निविदाकारांची निविदा रद्द करण्यात येईल.

३. निविदेसोबत सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक असून निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे आवश्यकतेनुसार तपासणीसाठी या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४. निविदाकाराने निविदा सादर करण्यापूर्वी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक ०७.०५.२०२१, चे अवलोकन करावे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क. दि.२७.०४.२०२२ चे अवलोकन करावे.

५. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाची दिनांक १२/०८/२०२४ च्या अधिसुचनेचे अवलोकन करावे.

६. केंद्र शासनाच्या दि.०६/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे विहित केलेले सेवाशुल्क मर्यादा लागू राहील.

## ३. अस्विकृती

१) लोक आयुक्त कार्यालय, मुंबई येथील अधिकारी/ कर्मचा-यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. या प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे :

(अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य.

(ब) त्यांचे पती किंवा पत्नी

(क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहिण यांच्याप्रमाणे संबंधित असलेले.

२) ज्या कंत्राटदार/संस्थेची यापूर्वी शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्था यांना मनुष्यबळ सेवा पुरविण्यासाठी निवड केली होती व अशा कंत्राटदार/संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल वा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल, अशा कंत्राटदाराला/संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. तसेच अशा कंत्राटदाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदार जर अन्य संस्थेत भागीदार असेल तर अशा संस्थेला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

## ४. बयाणा रक्कम :-

**१. निविदा स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. ३०००/- इतकी ना-परतावा निविदा शुल्क (Tender Fee) आणि रु.५०,०००/- इतकी बयाणा रक्कम (EMD)ऑनलाईन प्रदानाव्दारे भरणे आवश्यक आहे.**

२. संबंधित निविदाकाराने बयाणा रक्कम भरण्यापासून विहित निकषानुसार सूट असल्यास त्याबाबतचे नजिकच्या काळातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र स्पष्ट सही शिक्क्यांसह निविदेसोबत स्कॅनकॉपी सादर करणे आवश्यक राहील.

३. निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर, निविदा स्वीकृत न झालेल्या इतर निविदाधारकांची बयाणा रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाईल. यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत काम देण्यापूर्वी देय असणारी सुरक्षा ठेव रक्कम भरल्यानंतर बयाणा रक्कम परत दिली जाईल. यशस्वी निविदाकाराने निर्धारीत कालावधीत सुरक्षा ठेवीची रक्कम भरली नाही किंवा कराराचा भंग केल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

४. बयाणा रक्कमेवर (EMD) कोणतेही व्याज देय असणार नाही.

५. **सुरक्षा ठेव: -**

१. यशस्वी निविदाकर्ता, निविदा स्वीकारल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, अधिकृत राष्ट्रीय बँकेकडील बँक गॅरंटीच्या स्वरुपात ३ कर्मचाऱ्यांच्या ११ महिन्यांच्या कालावधीकरिता होणा-या मानधनाच्या एकूण निविदेच्या मुल्याच्या **(एकूण रकमेच्या) ३%** इतकी रक्कम सुरक्षा अनामत ठेव म्हणून या विभागाकडे जमा करेल आणि निविदाकर्ता करार दस्तऐवज पूर्ण करण्यास अयशस्वी ठरल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. या कराराच्या किंवा अन्य कराराच्या अटीनुसार कंत्राटदाराकडून देय असलेली सर्व नुकसान भरपाई किंवा इतर रकमा या सुरक्षा ठेवीमधून वजा केल्या जातील.

३. सुरक्षा ठेवीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४. करार संपल्यानंतर ९० दिवसांच्या मुदतीत सुरक्षा ठेव परत दिली जाईल.

५. **निविदा दोन लिफाफे प्रणालीनुसार स्विकारली जाईल:-**

**अ) लिफाफा क्र.१ : तांत्रिक लिफाफ्यात खालील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.** सर्व दस्तऐवज पृष्ठ क्रमांकांसह सादर करावेत. (सदरची कागदपत्रे अनिवार्य असतील.)

**तांत्रिक लिफाफा :**

| | |
|---|---|
| १. | संस्थेचे नाव, संस्थेचा पूर्ण पत्ता, संस्थेचा नोंदणी क्रमांक, संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक व संस्थेचा कार्यालयीन ई-मेल आयडी याबाबतची माहिती दर्शविणारे परिशिष्ट - १<br>(पृ. ते ) |
| २. | संबंधित संस्था ही खालीलपैकी किमान एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.<br>(नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. (पृ. ते )<br>• भागीदारी संस्था अधिनियम.<br>• सहकारी संस्था अधिनियम.<br>• कंपनी अधिनियम.<br>• दुकाने व आस्थापना अधिनियम. |
| ३. | संस्थेची घटना व नियमावली प्रत (पृ. ते ).<br>(संस्था नोंदणी पत्राची नुतनीकरण केलेली अद्ययावत सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे)<br>संस्थेनुरुप मनुष्यबळ पुरविणे हे संस्थेच्या कार्यकक्षेत येत असलेबाबत संबंधित कायदेशीर नोंद असलेली कागदपत्रे सादर करावीत. संस्थानुरुप सदर निविदेमध्ये भाग घेण्याबाबतचे संबंधित संस्थाचालक/सदस्य/भागीदार यांच्या परवानगीची प्रत. |
| ४. | मागील ३ वर्ष (सन २०२३-२०२४, २०२४-२०२५, २०२५-२०२६ ) या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन काम समाधानकारकरित्या केल्याचे संबंधित कार्यालयाचे पत्र. (पृ. ते ). |
| ५. | संस्थेची मागील तीन वित्तीय वर्षाची (सन २०२३-२४, सन २०२४-२५ व सन २०२५-२६) सरासरी उलाढाल (Turn Over). याबाबत निविदाकाराने सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र जोडावे पृ. ते ) |
| ६. | संस्थेच्या मागील ३ वर्षाच्या आयकर परताव्याच्या (Income tax returns) प्रती. (पृ. ते ). |
| ७. | वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. (पृ. ते ). |
| ८. | लेबर कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १९७० नुसार कंत्राटी कामगार परवाना नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. (पृ. ते ). |
| ९. | राज्य कामगार विमा योजना अधिनियम १९४८ प्रमाणे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. त्या कायद्यातील तरतूदीनुसार मागील वर्षाची विमा वर्गणी भरल्याची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. (पृ. ते ). |

| | |
|---|---|
| १०. | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अंतर्गत नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. या कायद्यातील तरतूदीनुसार मागील वर्षाची वर्गणी भरल्याची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. |
| ११. | संस्थेच्या PAN Card/ TAN प्रमाणपत्र ची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. (पृ. ते ). |
| १२. | व्यवसाय कर अधिनियमाखालील नोंदणीचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. तसेच मागील वर्षाचा व्यवसाय कर भरल्याच्या चलानाची प्रत सादर करावी. (पृ. ते ). |
| १३. | महाराष्ट्र कर्मचारी कल्याण निधी खालील नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी. तसेच मागील वर्षाचा निधी भरल्याची प्रत सादर करावी. (पृ. ते ). |
| १४. | शासनाकडून मानधन मिळण्यास विलंब झाल्यास २ महिने मानधन अदा करण्यास सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. (पृ. ते ). |
| **१५.** | बयाणा रक्कम आणि निविदा प्रपत्र फी भरल्याची पावती (पृ.क्र. /प.वि.)<br>विविध शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठ्याकरिता निविदा भरताना बयाना रक्कम भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. (पृ. ते ). |
| १६. | निविदेमध्ये दर्शविण्यात आलेल्या शैक्षणिक/तांत्रिक अर्हतेनुसार मनुष्यबळ पुरविण्याबाबतचे हमीपत्र सादर करण्यात यावे. (पृ. ते ). |
| १७. | किमान वेतन कायदा व त्याअनुषंगिक विहीत नियमास अनुसरुन निविदा सादर करण्यात आली असून भविष्यात सदर नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे हमीपत्र सादर करण्यात यावे. (पृ. ते ). |
| १८. | संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलीस चौकशी/ तपास, न्यायालयीन प्रकारणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे अथवा संस्था भागिदारीत असल्यास सर्व भागिदारांचे सहीनिशी सादर करण्यात यावे (पृ. ते ). |
| १९. | ISO. १०६६७-२:२०२० प्रमाणपत्राची प्रत जोडावी (पृ. ते ). |

**१.** उपरोक्त दस्तऐवजाची निविदाकार पुर्तता करीत नसल्यास, तांत्रिक समिती नोंद घेईल आणि त्या निविदाकर्त्याचा लिफाफा क्र. २ पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेण्यात येणार नाही. तांत्रिक निविदा तपासणीनंतर पात्र असल्याचे आढळून आलेल्या निविदाकारांचा वाणिज्यक निविदा लिफाफा उघडण्यात येईल.

**२.** तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार ठरविण्यात येतील. अपात्र उमेदवारांच्या निविदा नाकारण्यात येतील व त्यांची बयाणा रक्कम (EMD) परत करण्यात येईल.

**३.** काही अपरिहार्य तसेच तांत्रिक कारणांमुळे निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल होऊ शकतो. त्याबाबतच्या सूचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येतील.

**ब) वाणिज्यिक निविदा (आर्थिक लिफाफा) :-**

**१.** वाणिज्यिक निविदा, परिशिष्ट-२ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार असावी.

**२.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ. पु. क्र. दि.२७.०४.२०२२ मधील तरतुदीनुसार नियमित पदांच्या खर्चापेक्षा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर कर्मचारी/वाहनचालक घेतल्यास **२० ते ३० टक्के** शासनाची बचत अपेक्षित आहे. तसेच, निविदा मिळविण्यासाठी किमान वेतनापेक्षा कमी दराची निविदा भरल्याचे आढळून आल्यास सदरची वाणिज्यक निविदा निम्नतम दराची असेल तरी ती अवैध ठरवून रद्द करण्यात येईल. सदर बाब विचारात घेऊन निविदाकाराने निविदा भरणे आवश्यक आहे.

**३.** निविदेत नमूद केलेले दर हे करारनामा केल्यानंतर ११ महिन्याच्या निविदा कालावधीत कायम राहतील व कोणत्याही परिस्थितीत दरामध्ये वाढ होणार नाही.

क) **निवड निकष**

- निविदा जारीकर्ता तांत्रिक आर्थिक अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या व सर्वात न्युनतम दर /रकमेच्या निविदा धारकाची (L१) निवड करेल.
- एका पेक्षा अधिक पात्र L १ निविदा धारक उपलब्ध झाल्यास खालील मुद्दयाच्या अनुषंगाने त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल.

  १) जास्तीत जास्त वेळा मुंबई/मुंबई उपनगर येथील कार्यालयात **केवळ राज्य शासकीय** कार्यालयांना सेवा पुरवठा केल्याचा अनुभव असलेली निविदाकार संस्था.

  २) निविदाकाराची **उच्च आर्थिक उलाढाल** व गुणवत्ता

  ३) निवड समितीस योग्य वाटतील अशा बाबी विचारात घेऊन संस्थेची अंतिम निवड करण्यात येईल.

६. <u>निविदा खालील कारणास्तव नाकारण्यात येतील: -</u>

१) निविदाकारांनी निविदा सादर करण्याबाबत निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केले नाही.

२) निविदाकारांनी निविदा किंवा निविदा प्रक्रियेत कोणत्याही कामाचे किंवा परवानगी दिलेल्या वेळेत किंवा अन्य कोणतीही परिस्थितीत बदल करण्याचे प्रस्तावित केले असेल.

३) निविदाकारांनी दस्तऐवजाच्या कोणत्याही पृष्ठावर कोणतीही सुधारणा, वाढ व फेरबदल केले असेल.

४) निविदा नमुन्यामधील कोणतीही पृष्ठे काढून टाकली असतील किंवा बदल केले असेल.

५) निविदाकारांनी सर्व दुरुस्त्या आणि जोडण्या किंवा पेस्ट केलेल्या स्लिप्सवर सही केलेली नाही आणि संस्था किंवा कंपनीच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने त्यावर सही केली नाही.

६) निविदाकाराने कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा, १९७० आणि महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम, १९७० च्या खाली आवश्यक असणारी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे नोंदणी असल्याची मूळ परवान्याची प्रत किंवा प्रमाणित प्रत सादर केलेली नाही.

७) निविदाकारांनी मागणीनुसार मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास किंवा सादर केलेल्या प्रती व मूळ प्रती यामध्ये फरक आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

७. <u>सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) खालील प्रकरणी जप्त केली जाईल: -</u>

१. कार्यादेश दिलेला निविदाकार स्विकृत निविदा कालावधीत कोणत्याही कारणाने सेवा पुरविण्यास असमर्थ ठरल्यास.

२. स्विकृत निविदाकाराने निविदा कालावधीत उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचा-यांची वेतन व भत्ते इत्यादी ची देणी थकित असल्यास.

३. स्विकृत निविदाकराने देय असलेले सर्व प्रकारचे कर/वजावटी पूर्णत: संबंधित प्राधिकरणाकडे भरणा केला नसल्यास.

४. निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्यास.

८. <u>कायद्याचे नियमन व विवादाचा निपटारा:-</u>

१. कार्यादेश व करारासंबंधीत उद्धवलेल्या कोणत्याही वादग्रस्त मतभेदाचे प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई आणि संस्थेचे प्रतिनिधी थेट चर्चा करुन सौहार्दपूर्ण वातावरणात निराकरण करण्याचा प्रयत्न करतील.

२. सदर कराराच्या अनुषंगाने कोणताही विवाद उद्धवल्यास याबाबतची संपुर्ण कार्यवाही मा. मुंबई न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च संबंधित संस्थेचा राहील.

९. <u>दिवाळखोरी आणि कर्तव्यात कसुरीसाठी दरकरार समाप्ती.</u>

१. दिवाळखोरीसाठी समाप्ती :- स्वीकृत निविदाकार संस्था दिवाळखोर आढळल्यास, अशा संस्थेस प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई हे १ महिन्याची नोटीस देऊन कोणतीही नुकसान भरपाई न देता कार्यादेश/करार संपुष्टात आणेल.

२. खालीलप्रमाणे सेवा करार संपुष्टात आणण्यात येईल: -

अ) शासनाने कार्यादेशाव्दारे दिलेल्या कालावधीत किंवा वाढीव कालावधीत स्वीकृत निविदाकार संस्था सेवा देण्यास अयशस्वी ठरल्यास.

ब) स्वीकृत निविदाकार संस्था कार्यादेश व करारांतर्गत दिलेल्या अटी व शर्तीनुसार कोणत्याही जबाबदाऱ्या पार पाडण्यात अयशस्वी ठरल्यास.

१०. **<u>अतिरिक्त अटी व शर्ती :-</u>**

१. यशस्वी निविदाकाराला त्याची निवड झाल्याबाबत कार्यालयामार्फत पत्राद्वारे/ई-मेल व्दारे कळविण्यात येईल. हे पत्रे/ई-मेल प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आत विहित नमुन्यातील स्विकृतीपत्र व अनामत रक्कम/बँक गॅरंटी कार्यालयात जमा करावी लागेल. या मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम व स्विकृती पत्र सादर न केल्यास त्या निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल व बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. बयाणा रकमेपासून सुट घेतलेल्या निविदाकारांचे बाबतीत संस्थेचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल. निवड झालेल्या पात्र निविदाकाराने अनामत रक्कम जमा केल्यानंतरच **<u>कार्यादेश</u>** देण्यात येईल.

२. ज्यांची निविदा स्वीकारली गेली आहे अशा यशस्वी निविदाकाराला मनुष्यबळाच्या सेवा पुरविण्याबाबत विहित मुदतीत रु. १००/- च्या गैरन्यायिक मुद्रांकावर (यशस्वी निविदाधारक मुद्रांक शुल्क खर्च करेल.) करणे आवश्यक राहील. सदर करार संपुष्टात आणणे अथवा त्यास आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणे याबाबतचा निर्णय या कार्यालयाचा राहील.

३. लोक आयुक्त कार्यालयाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार न्यूनतम निविदाधारकास मनुष्यबळ पुरवठा आणि इतर अटी शर्तीबाबत करारनामा करणे बंधनकारक राहील.

४. करारनामा झाल्यानंतर ३ दिवसांचे आत शैक्षणिक अर्हता / उमेदवारांचे छायाचित्र (फोटो)/ आधारकार्ड/पॅन कार्ड/वास्तव्याचा पुरावा इ. आवश्यक कागदपत्रे व उमेदवारांची यादी विभागास सादर करावी. विभागामार्फत उमेदवाराची मुलाखत घेतली जाईल. तद्नंतर विभागाने उमेदवार योग्य असल्याचे कळविल्यावर मान्यता देण्यात आलेले उमेदवार पुरविण्यात यावेत.

५. अंतिम निवड झालेल्या निविदाधारकास मागणीनुसार मनुष्यबळाचा पुरवठा करणे अनिवार्य राहील. मनुष्यबळ सेवा पुरवठा करण्याकरिता दोन वर्षाच्या कालावधीसाठी करारनामा करण्यात येईल.

६. प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार लोक आयुक्त कार्यालय, मुंबई यांना राहील.

७. संस्थेस मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्याच्या आत मागणीनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे, अन्यथा प्रती दिन, प्रती उमेदवार रु.५००/- (रुपये पाचशे मात्र) चा दंड संस्थेकडून घेण्यात येईल अथवा संस्थेच्या अनामत रकमेतून सदर दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

८. मनुष्यबळ पुरविण्याऱ्या संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या उमेदवारांचा संपूर्ण तपशील त्यांचेकडे ठेवणे अनिवार्य आहे. यामध्ये उमेदवारांचे संपुर्ण नाव, पत्ता, शैक्षणिक/तांत्रिक अर्हतेचा तपशील, नमुना स्वाक्षरी, कायमस्वरुपी पत्ता, पासपोर्ट साईज फोटो इ.माहितीचा समावेश करण्यात यावा. संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी

पार्श्वभूमीचा नसावा. उमेदवाराच्या सचोटी व चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला संस्थेने सादर करणे बंधनकारक असेल.

९. संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. याबाबतचे स्वयंघोषणापत्र उमेदवाराने तसेच संबंधित संस्थेने सादर करणे आवश्यक राहिल. कार्यालयीन कामकाजात उमेदवारांकडून कसूर अथवा आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेंची राहील आणि झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संबंधित संस्थेकडून करण्यात येईल. संस्थेकडून पुरविण्यात येणारे उमेदवार हे कार्यालयीन कामकाज करण्यासाठी शारिरीकदृष्ट्या सक्षम असावेत.

१०. एखादा कर्मचारी काम सोडून गेल्यास त्याऐवजी दुसरा कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. सेवा पुरवठादार / कंत्राटदाराने पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास त्याच्या जागी संस्थेने दुसरा कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

११. सेवा पुरवठादार / कंत्राटदाराने उपलब्ध करुन दिलेला एखादा उमेदवार एका आठवडयापेक्षा जास्त कालावधीसाठी गैरहजर राहणार असेल तर त्याच्या जागी दुसरा उमेदवार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१२. संबंधित उमेदवाराने शासनाच्या कार्यालयीन मालमत्तेची काळजी / देखभाल घेणे आवश्यक राहील, शासनाच्या झालेल्या नुकसानीची जबाबदारी संबंधित संस्थेवर असेल व झालेल्या नुकसानीची वसुली संस्थेकडून करण्यात येईल.

१३. बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांची सेवा पूर्णपर्ण कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच कायमस्वरुपी शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत मिळणाऱ्या लाभांकरीता बाह्ययंत्रणाद्वारे / कंत्राटीतत्वावर काम केलेले अथवा कार्यरत असणारे उमेदवार पात्र असणार नाहीत, **तसेच त्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व कार्यालयावर/ शासनावर असणार नाही.**

१४. **कंत्राटदार संस्थेद्वारे प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भत्ते लागू होणार नाहीत.**

१५. बाह्ययंत्रणेमार्फत संस्थेद्वारे भरण्यात आलेले उमेदवार अथवा संबंधित संस्था हे कायमस्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे / शासनाकडे / न्यायालयाकडे दावा अथवा खटला भरणार नाहीत अशा आशयाचे उमेदवाराचे व संस्थेचे हमीपत्र सेवा पुरविताना संस्थेने कार्यालयास देणे आवश्यक राहिल.

१६. बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उमेदवाराचे करार कालावधीत निधन झाल्यास उमेदवार/ संस्था कोणत्याही भरपाईस पात्र असणार नाहीत. तसेच उमेदवारास कोणत्याही स्वरुपाची गंभीर इजा झाल्यास अथवा त्या अनुषंगाने तात्पुरते किंवा कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास त्याच्या उपचाराच्या खर्चाचे कोणतेही दायित्व कार्यालयावर / शासनावर असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी "वर्क्समन कॉम्प्नसेशन ॲक्ट् १९२३" मधील तरतूदीनुसार संबंधित संस्थेची राहील. तशा आशयाचे बंधपत्र यशस्वी निविदाकारास कराराचे वेळी द्यावे लागेल.

१७. शासकीय कामकाजाचे अनुषंगाने आवश्यक गोपनियतेचा भंग होणार नाही याची जबाबदारी संबंधित उमेदवार तसेच संस्थेची असेल. गोपनीयतेचा भंग झाल्यास त्या संदर्भाने संस्था तसेच संबंधित उमेदवारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार विभागास राहील.

१८. **मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता शासनाच्या प्रचलित सर्व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.**

१९. निवड झालेल्या संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास तसेच करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास संस्था अपात्र ठरविण्यात येऊन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अथवा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२०. मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने अन्य सेवापुरवठादार संस्थेशी उपकरार करण्यात प्रतिबंध आहे. तथापी संस्थेने अश्या प्रकारे उपकरार केल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेशी करण्यात आलेला करार रद्द करण्यात येऊन भरलेली अनामत रक्कम / बँक गॅरेंटी जप्त करण्यात येईल.

२१. शासनाकडून वेतन देयक अदा करण्यापूर्वीच कंत्राटदार संस्थेने त्यांच्या निधीतून कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कर्मचाऱ्याच्या बैंक खात्यात जमा करणे आणि वेतनचिठ्ठी देणे अनिवार्य राहील. वेतन अदा करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिन प्रतिकर्मचारी रु.५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

२२. उपरोक्त अ.क्र.२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन अदा केल्यानंतर कंत्राटदार संस्थेने पुरवठा केलेल्या मनुष्यबळाच्या वेतनाचे मासिक देयक प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत लोक आयुक्त कार्यालयाकडे जमा करावे. तद्नंतर मंजूर दरानुसार २१ दिवसांत रक्कम कंत्राटदार संस्थेस अदा करण्यात येईल. कंत्राटदार संस्थेस कोणत्याही प्रकारचे अग्रीम वेतन देण्यात येणार नाही.

२३. उपरोक्त अ.क्र.२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थेने एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीपर्यंत कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास कंत्राटदार संस्थेने कसूरी केल्यास सदर संस्थेशी केलेला करार रद्द करून संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच संबंधीत कंत्राटदार संस्थेची सुरक्षा अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

२४. शासनाकडून/कार्यालयाकडून देयक अदा करण्यास विलंब झाला तरीही दरमहा १० तारखेच्या आत उमेदवारांना वेतन / मानधन अदा करण्याची वेतन चिठ्ठी देण्याची जबाबदारी निवड झालेल्या निविदाकाराची असेल.

२५. कंत्राटदार संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या उमेदवारांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत कार्यालयात उपस्थित असणे बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात थांबावे लागेल. तसेच वेळप्रसंगी कामाची निकड विचारात घेऊन सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील. त्याअनुषंगाने वित्त विभागाच्या दिनांक ०७.०८.२०२३ च्या शासन निर्णयानुसार वाहनचालकास अतिकालिक भत्ता अनुज्ञेय राहील.

२६. निविदा मसुद्याचे सूक्ष्म अवलोकन करून परिपूर्ण निविदा सादर करण्याची दक्षता निविदाकाराने घ्यावी.

२७. कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा तसेच मनुष्यबळाच्या संख्येत वाढ/घट करण्याचा अधिकार लोक आयुक्त कार्यालयास राहील.

22/09/26

(अशोक सा. जाधव)
**प्र बं ध क**
लोक आयुक्त कार्यालय,
मुंबई-४०० ०३२.

<u>परिशिष्ट-१</u>

<u>तांत्रिक निविदा प्रपत्र</u>

**टिप - निविदाकार सर्व आवश्यक माहिती मूळ निविदा फॉर्ममध्ये सादर करतील आणि पुराव्याच्या समर्थनार्थ आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडतील.**

१. कंपनी / संस्थेचे नाव आणि पत्ता.

२. संपर्क क्रमांक कार्यालय - अ) दुरध्वनी : क) भ्रमणध्वनी :
ब) फॅक्स : ड) ई-मेल :

३. बॅंकर्सचे नाव व पुर्ण पत्ता

अ) ब्रँच कोड :
ब) खाते प्रकार :
क) बँक खाते क्रमांक :
ड) MCR कोड :
ग) IFSC कोड :

४. संस्थेचे नोंदणी क्रमांक :

५. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम नोंदणी क्रमांक :

६. कर्मचारी राज्य विमा अधिनियम नोंदणी क्रमांक :

७. व्यवसाय कर अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक :

८. वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक :

मी/आम्ही निविदा दस्तऐवजांचे सर्व नियम आणि अटी वाचल्या आहेत आणि मी /आम्ही त्यांचे पालन करण्यास बांधील आहे/आहोत. निविदेतील अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

**स्वाक्षरीकर्त्याचे नाव व तपशिल :** **स्वाक्षरी (अधिकृत)**

टिप : तांत्रिक निविदेतील सर्व पृष्ठे अनुक्रमित असावी आणि त्यावरील सर्व पृष्ठावर अधिकृत स्वाक्षरीकाराने स्पष्ट स्वाक्षरी केलेले आणि मुद्रांकित केले पाहीजे.

# परिशिष्ट-२

## वाणिज्यक निविदा (Commercial Bid)

| | |
|---|---|
| वाहन चालक यांच्या वेतनाचा/मानधनाचा<br>मासिक ठोक दर नमूद करावा.<br><br>(सदर दरात किमान वेतन,महागाई भत्ता,घरभाडे<br>भत्ता, भविष्य निर्वाह निधी (EPF),राज्य कामगार<br>विमा योजना (ESIC),व्यावसायिक कर (P.T) बोनस,कामगारकल्याण निधी,सेवा शुल्क<br>व लागू असलेले सर्व कर विचारात घेवून मासिक ठोक<br>दर/मानधन नमूद करावा) | मासिक दर/मानधन (रुपयात)<br><br>अंकात रुपये<br><br>अक्षरात रुपये |